जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-
cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र. 9819208279

प्रेसनोट **दिनांक २६.०२.२०२५**

३५ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा ठाणे २०२५

दिनांक २२/०२/२०२५ रोजी पासून ३५ वी महराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा ठाणे २०२५ ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत सुरू झाली असून, सदर स्पर्धेमध्ये निरनिराळया पोलीस विभागाच्या टिम अतिशय विक्रमी कामगिरी करीत आहेत.

दिनांक २६/०२/२०२५ रोजी ठाण्याच्या रहेजा कॉम्पलेक्स येथील ठाणे स्पोर्ट क्लब येथे **जलतरण व डायविंग (पुरूष)** या खेळाच्या स्पर्धा पार पडल्या. सदर स्पर्धेमध्ये **मुंबई शहर या संघाचे परशार सातर्डेकर** या खेळाडुने अतिशय उत्कृष्ट कामगिरी केली असुन त्याने **४०० मीटर फ्रि स्टाईल, ५० व १०० मीटर फ्रि स्टाईल, ५० व १०० मीटर बटरफ्लाय, २०० मीटर इन्डीव्हयूजवल या खेळांमध्ये एकुण ०६ सुवर्ण पदक पटकावून मुंबई शहर संघाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.**

या व्यतिरिक्त ठाणे शहर पोलीस क्रिडा संकुल येथे पार पडलेल्या **भालाफेक (पुरूष)** या खेळाच्या प्रकारात **मुंबई शहर** या संघाचे अनील घुंगासे या खेळाडुने **०१ सुवर्ण पदक** तसेच **भालाफेक (महिला)** गटात **पुणे आणि पिंपरी चिंचवड** या संघाच्या अनिता जारवाल यांना **०१ सुवर्ण पदक** प्राप्त झाले आहे.

ॲथलेटिक्स (महिला) १५०० मीटर धावणे या खेळाच्या प्रकारात **पुणे आणि पिंपरी चिंचवड** या संघाच्या **यामीनी ठाकरे** यांना ०१, तसेच **४०० मीटर धावणे** या खेळात **मुंबई शहर** या संघाच्या **कोमल खांडेकर** यांना ०१ तसेच **१०० मीटर अडथळा व ४ x १०० मीटर रिले** या दोन्ही प्रकारात **प्रशिक्षण संचालनालय संघाच्या सोनाली पवार** यांनी ०२ सुवर्ण पदके पटकावून उल्लेखनिय कामगिरी केली आहे, **ॲथलेटिक्स (पुरूष) १५०० मीटर धावणे व ४ x १०० मीटर रिले** या प्रकारात **प्रशिक्षण संचालनालय** या संघाचे **ओंकार कुंभार** यांनी ०२ सुवर्ण पदके प्राप्त करून उल्लेखनिय कामगिरी केली आहे . **४०० मीटर धावणे** या प्रकारात **मुंबई शहर** संघाचे **करण पाटील** यांनी ०१ सुवर्ण पदक आणि **११० मीटर अडथळा धावणे** या खेळाच्या प्रकारात **कोकण परिक्षेत्र** या संघाचे **करण पाटील** यांनी ०१ सुवर्ण पदक प्राप्त केले आहे.

अशा प्रकारे झालेल्या वैयक्तिक सामन्यांमध्ये सुवर्ण पदक विजेत्या सर्व खेळाडूंनी केलेल्या लक्षनिय कामगिरी बाबत ठाणे पोलीस आयुक्तालयातर्फे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर